कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भिवापूर, ता. भिवापूर यांचे न्यायालयात.

नियमीत फौ.ख.क्र.३२/२०१९
सर -वि- राजेंद्र व २
निशाणी क्र. २५

**दो षा रो प**

मी, वि. सं. डामरे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भिवापूर या द्वारे तुम्हीः

१) **राजेंद्र गुलाबराव शिंदे,**
वय ४० वर्षे, व्यवसायः शेती,

२) **सौ. नैना राजेंद्र शिंदे,**
वय ३२ वर्षे, व्यवसाय : घरकाम,
दोन्ही रा. मंगळवारी पेठ, उमरेड, ता. उमरेड, जि. नागपूर.

३) **पवन संजयराव जगताप,**
वय २९ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
रा. दिघोरी, नागपूर, जि. नागपूर.

यांच्यावर खाली दिल्याप्रमाणे आरोप ठेवतो :

तुम्ही दिनांक ०४.११.२०१८ रोजी १३.०० ते १३.३० वा. चे सुमारास मौजा भोवरी सालेभटट्‌ी शिवार, येथे समान उदद्‌ेशाने फिर्यादी सौ. उज्वला सुरेश शिंदे चे पती सुरेश शिंदे यास, जे की हत्यार म्हणून वापरल्यास मृत्यू संभवू शकते लोखंडी पाइपने त्याच्या डाव्या हाताच्या ढोपरला व पाठीवर मारुन इच्छापुर्वक दुखापत केली आणि त्यायोगे भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सह कलम ३४ याखाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयात दखलपात्र असा अपराध केला आहे.

दुसरे असे की उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही समान उदद्‌ेशाने फिर्यादी उज्वला शिंदे हिला ओढताण करुन तिचे ब्लाउज फाडून विनयभंग करण्याच्या उदद्‌ेशाने फौजदारीपात्र बलप्रयोग केला आणि त्यायोगे भारतीय दंड संहितेचे कलम ३५४ सह कलम ३४ याखाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयात दखलपात्र असा अपराध केला आहे.



DISTRICT COURT NAGPUR

तिसरे असे की उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही समान उददेशाने फिर्यादी ला व तिच्या पतीला शिवीगाळ केली व उददेशपुर्वक अपमान करुन सार्वजनिक शांततेचा भंग होण्याच्या उददेशाने प्रक्षोभीत केले आणि त्यायोगे भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ सह कलम ३४ याखाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयात दखलपात्र असा अपराध केला आहे.

चौथे असे की उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही समान उददेशाने फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केली आणि त्यायोगे भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ सह कलम ३४ या खाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयात दखलपात्र असा अपराध केला आहे.

आणि याद्वारे मी असा निर्देश देत आहे की, उक्त आरोपाबाबत तुमची न्यायचौकशी करण्यात यावी.

स्वा/-
( वि. सं. डामरे )
दिनांक:२८/०६/२०१९
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
भि वा पू र

दोषारोपातील मजकुर आरोपींना वाचुन व समजावुन सांगण्यात आला असता त्याचा त्यांनी इन्कार केला व निर्दोष असल्याचे प्रतीकथन करुन सुनावणीस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

स्वा/-
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
भि वा पू र

DISTRICT COURT NAGPUR